भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३

**(सन २००३ चा अधिनियम क्रमांक ३४)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003

**(Act No. 34 of 2003)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये ३२.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक ६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि सिगारेट्स अॅन्ड अदर टोबॅको प्रॉडक्टस् (प्रोहिबिशन ऑफ ॲडव्हरटाईझमेंट अॅन्ड रेग्युलेशन ऑफ ट्रेड अॅन्ड कॉमर्स, प्रॉडक्शन, सप्लाय अॅन्ड डिस्ट्रीब्युशन) अॅक्ट, २००३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर २००६ यात पृष्ठ ९३ ते १०४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशारीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर २००६.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006 pages 93 to 104.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 9th November 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. नियंत्रणाच्या इष्टतेसंबंधी केंद्राद्वारे घोषणा.

३. व्याख्या.

४. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास प्रतिबंध

५. सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातीवर प्रतिबंध.

६. अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तीस आणि विशिष्ट क्षेत्रात सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादने यांची विक्री करण्यास प्रतिबंध.

७. सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यांवर निर्बंध.

८. वैधानिक इशारा तयार करावयाची रीत.

९. ज्या भाषेत वैधानिक इशारा दर्शविण्यात येईल ती भाषा.

१०. अक्षरांचे किंवा आकड्यांचे आकारमान.

११. निकोटिन आणि टार घटकांसाठी चाचणी प्रयोगशाळा.

१२. प्रवेश करण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार.

१३. सक्तीने ताब्यात घेण्याचा अधिकार.

१४. पुडके जप्त करणे.

१५. जप्त केले जाण्याऐवजी किंमत चुकती करण्याचा पर्याय देण्याचा अधिकार.

१६. जप्तीमुळे अन्य शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे.

१७. अभिनिर्णय.

१८. ताब्यात घेतलेल्या पुडक्यांच्या मालकाला संधी देणे.

१९. अपील.

२०. वैधानिक इशारा आणि निकोटीन व टारचे घटक नमूद करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

२१. विवक्षित ठिकाणी धूम्रपान केल्याबद्दल शिक्षा.

२२. सिगारेट व तंबाखू उत्पादनांची जाहिरात केल्याबद्दल शिक्षा.

२३. जाहिरात व जाहिरातीची सामग्री सरकार जमा करणे.

२४. विवक्षित ठिकाणी किंवा अठारा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तीस सिगारेटची किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांची विक्री केल्याबद्दल शिक्षा.

२५. कलमे ४ व ६ खालील अपराध्यांस प्रतिबंध, अटकावून ठेवणे आणि न्यायचौकशीचे ठिकाण.

२६. कंपन्यांनी केलेले अपराध.

२७. अपराध जमानतपात्र असणे.

२८. अपराध आपसात मिटविणे.

२९. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

३०. अनुसूचीमध्ये कोणत्याही तंबाखू उत्पादनांची भर घालण्याचा अधिकार.

३१. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

३२. निर्यात केल्या जाणाऱ्या सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादने यांना हा अधिनियम लागू नसणे.

३३. निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची**

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी-इंग्रजी शब्दसूची

# सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३

**(२००३ चा अधिनियम क्रमांक ३४)**

(६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान)

[१८ मे २००३]

**सिगारेटच्या आणि इतर तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातीस प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यासंबंधातील व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगित बाबी यासंबंधी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** ३९ व्या जागतिक आरोग्य संघटनेने तिच्या १५ मे १९८६ रोजी आयोजित केलेल्या चौदाव्या सर्वसमावेशक बैठकीत पारित केलेल्या ठरावात जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य असलेल्या ज्या राष्ट्रांनी अजूनपर्यंत तशी उपाययोजना केली नाही अशा राष्ट्रांना असे आवाहन केले आहे की, धूम्रपान न करणाऱ्या लोकांना तंबाखूच्या धुरापासून होणाऱ्या अपायांना अनैच्छिकपणे बळी पडण्यापासून प्रभावी संरक्षण पुरविण्यात येईल याबाबत खात्री करून घेण्यासाठी आणि तंबाखूचा वापर करण्याचे व्यसन जडण्यापासून मुलांचे आणि तरुणांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना करावी ;

**आणि ज्याअर्थी,** ४३ व्या जागतिक आरोग्य संघटनेने तिच्या १७ मे १९९० रोजी आयोजित केलेल्या चौदाव्या सर्वसमावेशक बैठकीत, ३९ व्या जागतिक आरोग्य संघटनेने पारित केलेल्या ठरावात व्यक्त केलेल्या चिंतेचा पुनरुच्चार केला आहे आणि सदस्य राष्ट्रांना असे आवाहन केले आहे की, त्यांनी त्यांच्या तंबाखू नियंत्रणाविषयक धोरणांचा कायदा बनवण्याबाबत विचार करावा आणि त्यांच्या नागरिकांना व विशेषकरून गर्भवती महिला व मुले यांसारख्या धोका संभवणाऱ्या गटाकडे लक्ष देऊन त्यांना तंबाखूच्या धूरापासून होणाऱ्या अपायांना अनैच्छिकपणे बळी पडण्यापासून संरक्षण देण्याकरिता उपाययोजना करावी, तंबाखूच्या वापरापासून परावृत्त करावे आणि त्यावर वाढते निर्बंध लादावेत आणि एकंदरीत, तंबाखू संबंधात सर्व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाहिराती, त्यास प्रोत्साहन देणे आणि त्या पुरस्कृत करणे या गोष्टी नष्ट करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत;

**आणि ज्याअर्थी,** लोकहितासाठी आणि सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी तंबाखूबाबत व्यापक कायदा अधिनियमित करणे इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद ४७ द्वारे व्यादिष्ट केल्यानुसार, एकंदरीत सार्वजनिक आरोग्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने, जे आरोग्यास घातक आहे अशा सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादनांच्या वापरास प्रतिबंध करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातीस प्रतिबंध करणे आणि त्याचा व्यापार व वाणिज्य उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चोपन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, " सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३" असे म्हणावे.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

**नियंत्रणाच्या इष्टतेसंबंधी केंद्राद्वारे घोषणा.** २. याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, लोकहितार्थ, केंद्राने तंबाखू उद्योग आपल्या नियंत्रणाखाली घेणे इष्ट आहे.

**व्याख्या.** ३. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,----

(क) "जाहिरात" यात, नोटीस, परिपत्रक, लेबल, वेष्टन किंवा अन्य कागदपत्र या स्वरूपात केलेल्या कोणत्याही दृश्य प्रतिरुपणाचा समावेश आहे आणि तसेच त्यात, तोंडी किंवा प्रकाश, आवाज, धूर किंवा वायू उत्पन्न करून किंवा पारेषित करून त्याद्वारे केलेल्या कोणत्याही घोषणेचा समावेश आहे ;

(ख) "सिगारेट" यात,----

(एक) कागदाचे किंवा तंबाखूचा अंतर्भाव नसलेल्या अशा कोणत्याही अन्य पदार्थाचे वेष्टन असलेली तंबाखूची कोणतीही गुंडाळी ;

(दोन) तंबाखूचा अंतर्भाव असलेल्या अशा कोणत्याही अन्य पदार्थाचे वेष्टन असलेली तंबाखूची कोणतीही गुंडाळी, जी तिचे दृश्यस्वरूप, फिल्टरमध्ये वापर केलेल्या तंबाखूचा प्रकार किंवा त्याचे आवेष्टन आणि लेबल यावरून सिगारेट म्हणून उपभोक्त्याला देऊ करता येईल किंवा त्याच्याकडून खरेदी केली जाऊ शकेल, अशा गुंडाळीचा समावेश होतो ; परंतु, यात विडी, चिरूट आणि सिगार यांचा समावेश होत नाही ;

(ग) "वितरण" यात नमुना म्हणून केलेल्या---मग ते मोफत असो किंवा अन्यथा असो---वितरणाचा समावेश आहे ;

(घ) "निर्यात" याचा व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह अर्थ, भारतातून भारताबाहेरील ठिकाणी नेणे, असा आहे ;

(ङ) "विदेशी भाषा" याचा अर्थ, जी एकतर भारतीय भाषा नाही किंवा इंग्रजी भाषा नाही, अशी भाषा, असा आहे ;

(च) "आयात" याचा व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह अर्थ, भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारतात आणणे, असा आहे ;

(छ) "भारतीय भाषा" याचा अर्थ, संविधानाच्या आठव्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली भाषा, असा आहे आणि यात, अशा भाषेच्या कोणत्याही बोली भाषेचा समावेश आहे ;

(ज) "लेबल" याचा अर्थ, कोणत्याही पुडक्यावर लावलेला किंवा त्यावर दिसून येणारा कोणताही लिखित, चिन्हांकित, मुद्रांकित, छापील किंवा रेखाचित्रीय मजकूर, असा आहे ;

(झ) "पुडके" यात आवेष्टन, पेटी, खोका, पत्र्याचा डबा किंवा अन्य पात्र यांचा समावेश आहे ;

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ट) "उत्पादन" यात व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह सिगारेट, सिगार, चिरूट, विड्या, सिगारेटचा तंबाखू, पाईपचा तंबाखू, हुक्क्याचा तंबाखू, चघळण्याचा तंबाखू, पानमसाला किंवा तंबाखू हे एक घटकद्रव्य (मग ते कोणत्याही नावाने ओळखले जात असो) असलेली कोणतीही चघळण्याची सामग्री किंवा तपकीर याचा समावेश आहे आणि त्यात, —

(एक) पात्राचे आवेष्टन करणे, लेबल लावणे किंवा पुन्हा लेबल लावणे ;

(दोन) ठोक स्वरूपातील पुडक्यांतून फुटकळ पुडक्यांमध्ये आवेष्टित करणे ; आणि

(तीन) तंबाखू उत्पादने विक्रीयोग्य करण्यासाठी कोणतीही अन्य पद्धत स्वीकारणे, या बाबींचा देखील समावेश आहे ;

(ठ) "सार्वजनिक ठिकाण" याचा अर्थ, जिथे लोकांना प्रवेश करता येतो--- मग तो हक्क म्हणून असो किंवा नसो---असे कोणतेही ठिकाण, असा आहे आणि त्यात, श्रोतृगृह, रुग्णालय इमारती, रेल्वे प्रतिक्षागृहे, मनोरंजन केंद्रे, उपाहारगृहे, सार्वजनिक कार्यालये, न्यायालय इमारती, शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, सार्वजनिक वाहने आणि जनतेकडून ज्या ठिकाणांना भेटी देण्यात येतात अशी ठिकाणे, यांचा समावेश आहे. परंतु त्यात, कोणत्याही खुल्या जागेचा समावेश नाही ;

(ड) " विक्री " याच्या व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह अर्थ, एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होणारे मालाच्या रूपातील मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण, असा आहे --- मग ते रोख रकमेसाठी किंवा उधारीवर किंवा देवाणघेवाणीच्या मार्गाने असो किंवा नसो --- आणि घाऊक स्वरूपातील असो किंवा किरकोळ स्वरूपातील असो आणि त्यात, विक्रीचा करार आणि विक्रीसाठी देकार आणि विक्रीसाठी प्रदर्शित करणे, यांचा अंतर्भाव आहे ;

(ढ) " धूम्रपान " याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील तंबाखूचे धूम्रपान, असा आहे--- मग ते सिगारेट, सिगार, विड्या या स्वरूपात असो किंवा अन्यथा पाईपच्या, वेष्टनाच्या किंवा कोणत्याही अन्य उपकरणांच्या सहाय्याने असो ;

(ण) " वैधानिक इशारा " याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा स्वरूपात आणि रीतीने सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यावर छापलेला किंवा रंगवलेला किंवा कोरलेला असा सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या वापराच्या विरोधातला इशारा, असा आहे ;

(त) " तंबाखू उत्पादने " याचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली उत्पादने, असा आहे.

**सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास प्रतिबंध.**

४. कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करू नये :

परंतु, तीस खोल्या असणाऱ्या एखाद्या हॉटेलमध्ये किंवा तीस किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींची आसनक्षमता असणाऱ्या एखाद्या उपाहारगृहात आणि विमानतळावर धूम्रपान क्षेत्रासाठी किंवा जागेसाठी वेगळी सोय करता येईल.

**सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातीवर प्रतिबंध.**

५. (१) सिगारेटच्या किंवा इतर कोणत्याही तंबाखू उत्पादनांच्या उत्पादन प्रक्रियेत, पुरवठ्यात किंवा वितरणात गुंतलेल्या किंवा गुंतला असल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादनांची जाहिरात करता येणार नाही आणि एखाद्या माध्यमावर नियंत्रण असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या माध्यमांमार्फत जाहिरात करावयाची व्यवस्था करता येणार नाही आणि कोणतीही व्यक्ती, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सिगारेटचा किंवा इतर तंबाखू उत्पादनांचा वापर किंवा खप सूचित करणार नाही किंवा त्यास, चालना देणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, कोणत्याही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आर्थिक लाभासाठी,----

(क) सिगारेट किंवा इतर कोणत्याही तंबाखू उत्पादनाची कोणतीही जाहिरात प्रदर्शित करणार नाही, प्रदर्शित करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा प्रदर्शित करण्याची परवानगी देणार नाही किंवा त्यासंबंधात प्राधिकार देणार नाही ; किंवा

(ख) सिगारेट किंवा इतर कोणत्याही तंबाखू उत्पादनाच्या जाहिरातींचा अंतर्भाव असलेली एखादी फिल्म किंवा व्हिडिओ टेप (दृकश्राव्य फीत) याची विक्री करणार नाही किंवा विक्रीची व्यवस्था करणार नाही किंवा विक्रीची परवानगी देणार नाही किंवा त्याबाबत प्राधिकार देणार नाही ; किंवा

(ग) सिगारेट किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाची जाहिरात असलेल्या किंवा ज्यात जाहिरातीचा अंतर्भाव आहे अशा कोणत्याही पर्णकाचे, हस्तपत्रकाचे किंवा कागदपत्राचे वितरण करणार नाही किंवा वितरण करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा वितरण करण्याची परवानगी देणार नाही किंवा त्याबाबत प्राधिकार देणार नाही ; किंवा

(घ) सिगारेट किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाची कोणतीही जाहीरात, कोणतीही जमीन, इमारत, भिंत जाहिरात फलक, चौकट, स्तंभ किंवा संरचना यांवर किंवा कोणत्याही वाहनावर किंवा वाहनात उभारणार नाही, त्यांचे प्रदर्शन करणार नाही, लावणार नाही किंवा ठेवू देणार नाही किंवा कोणत्याही जागेत कोणत्याही रीतीने ती प्रदर्शित करणार नाही :

परंतु, हे पोट कलम पुढील संबंधात लागू होणार नाही---

(क) सिगारेट किंवा कोणतीही इतर तंबाखू उत्पादन अंतर्भूत असणाऱ्या पुडक्यांच्या आतील बाजूस किंवा त्यांवर असलेली सिगारेटची किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाची जाहिरात ;

(ख) जेथे सिगारेट किंवा कोणतेही इतर तंबाखू उत्पादन वितरणासाठी किंवा विक्रीसाठी देऊ केले जाते अशा वखारीच्या किंवा दुकानाच्या प्रवेशाच्या ठिकाणी किंवा आतील बाजूस प्रदर्शित केली असेल अशी सिगारेट किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाची जाहिरात.

(३) कोणतीही व्यक्ती,—

(क) सिगारेट किंवा कोणतीही इतर तंबाखू उत्पादन ; किंवा

(ख) कोणत्याही अन्य व्यक्तीकडून पुरस्कृत केलेल्या किंवा शिष्यवृत्ती यांच्या बदल्यात दिलेली किंवा द्यावयाचे मान्य केलेली देणगी, बक्षीस किंवा शिष्यवृत्ती यांच्या बदल्यात सिगारेट किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचे कोणतेही व्यापारी चिन्ह किंवा ब्रॅन्ड नाव,

यांचा वापर किंवा खप यास कराराद्वारे वा अन्यथा चालना देणार नाही किंवा चालना देण्याचे मान्य करणार नाही.

**अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तीस आणि विशिष्ट क्षेत्रात सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादने यांची विक्री करण्यास प्रतिबंध.**

६. कोणतीही व्यक्ती,—

(क) अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, आणि

(ख) कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या सभोवताली शंभर यार्ड त्रिज्येच्या आत येणाऱ्या क्षेत्रात,

सिगारेट किंवा कोणतेही इतर तंबाखू उत्पादन विकणार नाही, विक्रीसाठी देऊ करणार नाही किंवा विकण्यास परवानगी देणार नाही.

**सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यांवर निर्बंध.**

७. (१) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडून उत्पादित केलेल्या, पुरवठा केलेल्या किंवा वितरण केलेल्या सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या प्रत्येक पुडक्यावर किंवा त्यांच्या लेबलवर कवटी आणि फुलीच्या आकारात हाडे अशा चित्रमय रेखाटनासह वैधानिक इशारा दिलेला असल्याखेरीज प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सिगारेटचे किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचे उत्पादन करणार नाही, त्याचा पुरवठा करणार नाही किंवा वितरण करणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडून विकण्यात आलेल्या, पुरवठा केलेल्या किंवा वितरित केलेल्या प्रत्येक सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या प्रत्येक पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर वैधानिक इशारा दिलेल्या असल्याखेरीज, सिगारेटचा किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचा व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार करणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडून आयात होणाऱ्या सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या प्रत्येक पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर वैधानिक इशारा असल्याखेरीज, भारतात मूल्याच्या मोबदल्यात वितरण किंवा पुरवठा करण्यासाठी किंवा विक्री करण्यासाठी सिगारेटची किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाची आयात करणार नाही.

(४) मूल्याच्या मोबदल्यात वितरण, विक्री किंवा पुरवठा करण्यासाठी आवेष्टित करण्यात आलेल्या सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांच्या किमान एका सर्वात मोठ्या पृष्ठभागावर वैधानिक इशारा दिलेला असेल.

(५) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडून उत्पादन झालेल्या, पुरवठा केलेल्या किंवा वितरित केलेल्या सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या प्रत्येक पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर, प्रत्येक सिगारेटमधील किंवा, यथास्थिति, कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनातील निकोटिनचे आणि टारचे घटक, त्याच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांसह दर्शविलेले असल्याखेरीज सिगारेटचे किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाचे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण करणार नाही :

परंतु, निकोटिन आणि टारचे घटक हे, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा कमाल अनुज्ञेय प्रमाणपेक्षा अधिक प्रमाणात नसतील.

**वैधानिक इशारा तयार करावयाची रीत.**

८. (१) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यावरील वैधानिक इशारा हा,—

(क) सुवाच्य आणि ठळक असेल ;

(ख) आकार व रंगाने नजरेत भरणारा असेल ;

(ग) पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर वापरलेली अन्य प्रकारची मुद्राक्षरे, अक्षरशैली किंवा रेखाचित्रीय मजकूर यापेक्षा ठळकपणे व स्पष्टपणे वेगळा उठून दिसेल अशा शैलीत किंवा मुद्राक्षरात प्रदर्शित केलेला असेल आणि पुडक्याच्या किंवा त्याच्या लेबलच्या रंगाच्या पार्श्वभूमीवर नजरेत भरतील अशा रंगात तो छापलेला, रंगवलेला किंवा कोरलेला असेल.

(२) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यावरील वैधानिक इशारा छापण्याची, रंगवण्याची किंवा कोरण्याची रीत या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी असेल.

(३) सिगारेट किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाचा समावेश असणारे प्रत्येक पुडके अशा रीतीने आवेष्टित करण्यात येईल की, जेणेकरून पुडके उघडण्यापूर्वी त्यावर किंवा त्याच्या लेबलवर असलेला वैधानिक इशारा ग्राहकांच्या दृष्टीस पडेल.

**ज्या भाषेत वैधानिक इशारा दर्शविण्यात येईल ती भाषा.**

९. (१) जेव्हा सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर वापरलेली भाषा ही,—

(क) इंग्रजी असेल तेव्हा, वैधानिक इशारा इंग्रजी भाषेत दर्शविण्यात येईल ;

(ख) कोणतीही भारतीय भाषा असतील तेव्हा, वैधानिक इशारा त्या भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये दर्शविण्यात येईल ;

(ग) इंग्रजी व एक किंवा त्यापेक्षा अधिक भारतीय भाषा अशा दोन्ही भाषा असतील तेव्हा वैधानिक इशारा हा इंग्रजी भाषेत, त्याचबरोबर, अशा भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये दर्शविण्यात येईल ;

(घ) अंशतः इंग्रजी आणि अंशतः कोणतीही भारतीय भाषा किंवा अनेक भाषा असतील तेव्हा, वैधानिक इशारा हा इंग्रजी भाषेत त्याचबरोबर अशा भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये दर्शविण्यात येईल ;

(ङ) कोणतीही विदेशी भाषा असेल तेव्हा, वैधानिक इशारा हा, इंग्रजी भाषेत दर्शविण्यात येईल ;

(च) अंशतः कोणतीही विदेशी भाषा आणि अंशतः इंग्रजी किंवा कोणतीही भारतीय भाषा किंवा अनेक भाषा असतील तेव्हा, वैधानिक इशारा हा, इंग्रजी भाषेत त्याचबरोबर अशा भारतीय भाषेत किंवा भाषांमध्ये दर्शविण्यात येईल.

(२) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांवर किंवा त्याच्या लेबलवर वैधानिक इशाऱ्याशी विसंगत असेल किंवा त्याला कमी लेखणारा असेल अशा कोणत्याही मजकुराचा किंवा विधानाचा समावेश असणार नाही.

**अक्षरांचे किंवा आकड्यांचे आकारमान.**

१०. सिगारेटवरील आणि कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांवरील कोणताही वैधानिक इशारा किंवा निकोटिन आणि टारच्या घटकांबाबतचा सूचक मजकूर हा, जर अशा इशाऱ्यात आणि सूचक मजकुरात वापरलेल्या प्रत्येक अक्षराची किंवा आकड्याची किंवा दोन्हींची उंची, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा उंचीपेक्षा कमी असेल तर, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अनुसार असल्याचे समजण्यात येणार नाही.

**निकोटिन आणि टार घटकांसाठी चाचणी प्रयोगशाळा.**

११. सिगारेटमधील आणि कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांमधील निकोटिन आणि टार घटकांच्या चाचणीच्या प्रयोजनासाठी, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या शासनाला आवश्यक वाटतील अशा चाचणी प्रयोगशाळांना मान्यता देईल.

**प्रवेश करण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार.**

**१२.** (१) उप निरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा राज्य अन्न व औषध प्रशासनाचा कोणताही अधिकारी किंवा केंद्र सरकार किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला, पोलीस उप निरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेले असे समतुल्य पद धारण करणारा कोणताही अन्य अधिकारी, याला जर, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे किंवा होत आहे याबाबत संशय घेण्यास कोणतेही कारण असेल तर, त्याला,—

(क) जेथे सिगारेटचा किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचा कोणताही व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार चालू आहे किंवा जेथे सिगारेटचे किंवा कोणतेही इतर तंबाखू उत्पादनांचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण करण्यात येत आहे ; किंवा

(ख) जेथे सिगारेटची किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांची कोणतीही जाहिरात करण्यात आलेली आहे किंवा करण्यात येत आहे ;

असा कोणताही कारखाना, इमारत, धंद्याचे ठिकाण किंवा अन्य कोणतेही ठिकाण यांमध्ये कोणत्याही वाजवी वेळेत, विहित केलेल्या रीतीने प्रवेश करता येईल आणि झडती घेता येईल.

(२) या अधिनियमान्वये घेतलेल्या प्रत्येक झडतीस आणि केलेल्या जप्तीस, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या तरतुदी लागू असतील.

**सक्तीने ताब्यात घेण्याचा अधिकार.**

**१३.** (१) उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा राज्य अन्न व औषध प्रशासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा केंद्र सरकार किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या, पोलीस उप निरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसेल अशा समतुल्य पदावरील कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला जर,—

(क) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या कोणत्याही पुडक्याच्या संबंधात, किंवा

(ख) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या कोणत्याही जाहिरातीच्या संबंधात,

या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले आहे किंवा करण्यात येत आहे असे वाटण्यास कारण असेल तर, त्याला विहित रीतीने असे पुडके किंवा जाहिरातीचे साहित्य ताब्यात घेता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये ताब्यात घेतलेले सिगारेटचे किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचे पुडके किंवा जाहिरातीचे साहित्य हे, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत असे सक्तीने ताब्यात घेतले होते अशा जिल्हा न्यायाधीशांची मान्यता, पुडके आणि साहित्य ठेवून घेण्यासाठी मिळविण्यात आलेली नसेल तर, ज्याने असे पुडके किंवा जाहिरातीचे साहित्य ताब्यात घेतले आहे त्या अधिकाऱ्याला साहित्य ताब्यात घेतल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी ठेवून घेता येणार नाही.

**पुडके जप्त करणे.**

**१४.** सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या ज्या कोणत्याही पुडक्यांच्या संबंधात किंवा सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या ज्या कोणत्याही जाहिरातीच्या साहित्याच्या संबंधात, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले असेल किंवा करण्यात येत असेल तर, ते पुडके किंवा ते साहित्य जप्त केले जाण्यास पात्र असेल :

परंतु, जेव्हा असा जप्त करण्याचा न्यायनिर्णय देणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने असे सिद्ध करण्यात येईल की, असे कोणतेही सिगारेटचे किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचे पुडके ज्या व्यक्तीच्या कब्जात, अधिकारात किंवा नियंत्रणात असल्याचे आढळून आले आहे ती व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनास जबाबदार नाही तेव्हा, असे न्यायालय त्या पुडक्यांच्या जप्तीबाबतचा आदेश काढण्याऐवजी त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनासाठी दोषी असणाऱ्या व्यक्तींच्या विरुद्ध या अधिनियमाअन्वये प्राधिकृत केलेला असा अन्य आदेश देईल.

**जप्त केले जाण्याऐवजी किंमत चुकती करण्याचा पर्याय देण्याचा अधिकार.**

**१५.** (१) जेव्हा जेव्हा सिगारेटचे किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनाचे कोणतेही पुडके जप्त करणे हे या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केले असेल तेव्हा, तसा न्यायनिर्णय देणाऱ्या न्यायालयाला, जप्त करण्याच्या न्यायनिर्णय देणाऱ्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, त्या पुडक्याच्या मालकास पुडके जप्त केले जाण्याऐवजी, त्या मालाच्या मूल्याइतकी किंमत चुकती करण्याचा पर्याय देता येईल.

(२) न्यायालयाने आदेश दिलेली किंमत चुकती केल्यानंतर ज्या व्यक्तीकडून सिगारेटचे किंवा इतर तंबाखू उत्पादनांचे असे पुडके ताब्यात घेतले होते ती व्यक्ती, त्या पुडक्याचे कोणतेही वितरण, विक्री किंवा पुरवठा करण्यापूर्वी अशा प्रत्येक पुडक्यावर वैधानिक इशारा आणि निकोटिन व टार पदार्थ सूचक मजकुराचा समावेश करून घेईल, या अटींवर ते पुडके त्या व्यक्तीला परत करण्यात येईल.

**१६.** या अधिनियमान्वये जप्ती केल्याने, किंमत चुकती करावयाचा आदेश दिल्याने या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही अन्य कायद्याच्या तरतुदींअन्वये एखादी व्यक्ती ज्या शिक्षेस पात्र ठरत असेल ती शिक्षा त्या व्यक्तीला ठोठावण्यास प्रतिबंध होणार नाही. **जप्तीमुळे अन्य शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे.**

**१७.** सिगारेट किंवा कोणतेही इतर तंबाखू उत्पादनांची जप्ती करण्याबाबतचा अभिनिर्णय किंवा किंमत चुकती करण्याबाबतचा आदेश हा,— **अभिनिर्णय**

(क) ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत असे जप्ती करण्याचे प्रकरण घडून आले असेल किंवा रक्कम चुकती करण्याचा आदेश दिला असेल त्या मूळ अधिकारिता असलेल्या प्रमुख दिवाणी न्यायालयाकडून कोणत्याही मर्यादेखेरीज दिला जाईल ;

(ख) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबत प्राधिकृत करील अशा पाच हजार रुपयांपेक्षा अधिक आर्थिक अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयापेक्षा खालचे नसेल अशा अन्य न्यायालयाकडून, त्याबाबत केंद्र सरकारद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादांना अधीन राहून दिला जाईल.

**१८.** (१) सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांचा मालक किंवा ते कब्जात असलेली व्यक्ती यांना, ज्या कारणाने असे पुडके जप्त करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या कारणाबाबत लेखी स्वरुपात माहिती देणारी नोटीस देण्यात आल्याखेरीज, आणि त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी कालावधीत, जप्त करण्याच्या विरोधात लेखी निवेदन करण्याची वाजवी संधी त्यांना दिल्याखेरीज आणि जर त्यांची इच्छा असल्यास, व्यक्तिशः किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज, ते पुडके जप्त करण्याचा न्यायनिर्णय देणारा आदेश किंवा किंमत चुकती करण्याचा निदेश देणारा आदेश काढण्यात येणार नाही : **ताब्यात घेतलेल्या पुडक्यांच्या मालकाला संधी देणे.**

परंतु, सिगारेटच्या किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांचे पुडके ताब्यात घेतल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत जर, अशी नोटीस दिली नाही तर, असे पुडके मालकाला किंवा जिच्या कब्जातून ताब्यात घेतले होते त्या व्यक्तीला त्या कालावधीच्या समाप्तीनंतर परत करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये तरतूद केली आहे त्या व्यतिरिक्त, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) च्या तरतुदी शक्य असेल तेथवर, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रत्येक कार्यवाहीस लागू असतील.

**१९.** (१) न्यायालयाच्या जप्तीबाबत न्यायनिर्णयामुळे, रक्कम चुकती करण्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, अशा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध ज्या न्यायालयाकडे अपील होऊ शकते अशा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल. **अपील.**

(२) अपिलीय न्यायालय, अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, अपील करण्यात आलेला निर्णय कायम करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा त्यात बदल करणारा आदेश काढील किंवा आवश्यक असेल तर, अतिरिक्त पुरावा घेतल्यानंतर नव्याने निर्णय घेण्यासाठी किंवा अभिनिर्णयासाठी त्याला योग्य वाटतील अशा निदेशांसह ते प्रकरण परत पाठवील :

परंतु, अपीलकर्त्याला निवेदन करण्याची संधी दिली असल्याखेरीज आणि जर त्याची इच्छा असल्यास, त्याच्या बचावाबाबत त्याचे व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीमार्फत म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज या कलमाअन्वये, जप्त करण्याऐवजी दंडाच्या रकमेत वाढ करण्याचा किंवा अधिकतम मूल्याचा माल जप्त करण्याचा आदेश देता येणार नाही.

(३) अपील न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध पुढील अपील दाखल करता येणार नाही.

**वैधानिक इशारा आणि निकोटिन व टारचे घटक नमूद करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.**

२०. (१) जी व्यक्ती पुडक्यावर किंवा लेबलवर वैधानिक इशारा आणि निकोटिन व टारचे घटक नमूद न केलेल्या सिगारेटची किंवा तंबाखू उत्पादनांचे उत्पादन किंवा निर्मिती करील ती पहिल्या वेळी दोष सिद्ध झाल्यावर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल, आणि दुसऱ्या वेळी किंवा त्यानंतरच्या प्रत्येक वेळी दोष सिद्ध झाल्यावर पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) जी व्यक्ती पुडक्यावर किंवा लेबलवर वैधानिक इशारा आणि निकोटीन व टारचे घटक नमूद न केलेल्या सिगारेटची किंवा तंबाखू उत्पादनांची विक्री किंवा वितरण करील ती पहिल्यावेळी दोष सिद्ध झाल्यावर एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल आणि दुसऱ्या वेळी किंवा त्यांनतरच्या प्रत्येक वेळी दोषसिद्ध झाल्यावर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

**विवक्षित ठिकाणी धूम्रपान केल्याबद्दल शिक्षा.**

२१. (१) जो कोणी, कलम ४ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तो दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) या कलमाखालील अपराध हा आपसात मिटवण्याजोगा असेल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये संक्षिप्त न्यायचौकशीसाठी तरतूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याची संक्षिप्त न्यायचौकशी करण्यात येईल.

**सिगारेटची व तंबाखू उत्पादनांची जाहिरात केल्याबद्दल शिक्षा.**

२२. जो कोणी, कलम ५ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तो, दोष सिद्ध झाल्यानंतर पुढील शिक्षांस पात्र ठरेल--

(क) पहिल्या वेळी दोष सिद्ध झाल्याच्या प्रकरणी दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा, आणि

(ख) दुसऱ्या वेळी व त्यानंतरच्या प्रत्येक वेळी दोष सिद्ध झाल्याच्या प्रकरणी पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड.

**जाहिरात व जाहिरातीची सामग्री सरकारजमा करणे.**

२३. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा कलम ५ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल या अधिनियमाखाली दोष सिद्ध झाला असेल तेव्हा सिगारेटची व इतर तंबाखू उत्पादनांची जाहिरातीची व जाहिरातीची सामग्री शासन सरकारजमा केली जाऊ शकेल आणि अशी जाहिरात व जाहिरातीची सामग्री या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने निकालात काढली जाईल.

**विवक्षित ठिकाणी किंवा अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तीस सिगारेटची किंवा कोणत्याही इतर तंबाखू उत्पादनांची विक्री केल्याबद्दल शिक्षा.**

२४. (१) जी व्यक्ती कलम ६ च्या तरतुदींचे उल्लंघन करील ती व्यक्ती या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(२) या कलमाखाली सर्व अपराध आपसात मिटवण्याजोगे असतील आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये संक्षिप्त न्यायचौकशीसाठी तरतूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याची संक्षिप्त न्यायचौकशी करण्यात येईल.

**कलमे ४ व ६ खालील अपराधांस प्रतिबंध, अटकावून ठेवणे आणि न्यायचौकशीचे ठिकाण.**

२५. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाखाली कृती करण्यासाठी सक्षम म्हणून एका किंवा अनेक व्यक्तींना प्राधिकृत करता येईल :

परंतु असे की, अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला, जर तिला असे मानण्यास वाजवी कारण असेल की, एखाद्या व्यक्तीने कलम ४ किंवा कलम ६ खालील अपराध केला आहे तर, अशा व्यक्तीस स्थानबद्ध करता येईल, मात्र आरोपी व्यक्तीने आपले नाव व पत्ता दिला आणि तिच्याविरुद्ध काढलेल्या समन्सला किंवा केलेल्या अन्य कार्यवाहीला ती रीतसर उत्तर देईल त्याबद्दल तिला अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याची तिने अन्य प्रकारे खात्री पटवली तर तिला अटकावून ठेवले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये अटकावून ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कायद्यानुसार तिच्यावर कार्यवाही करण्यासाठी ताबडतोब दंडाधिकाऱ्यांसमोर नेले जाईल.

(३) कलम ४ किंवा कलम ६ खालील अपराध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची अशा अपराधांची न्यायचौकशी, ती व्यक्ती जेथे असेल त्या ठिकाणी किंवा राज्य शासन त्या संदर्भात अधिसुचित करील त्या ठिकाणी तसेच त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तिची ज्या इतर कोणत्याही ठिकाणी न्यायचौकशी होण्यास ती पात्र असेल अशा अन्य ठिकाणीही केली जाईल.

(४) पोटकलमे (१) व (३) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्याची प्रत जनतेच्या माहितीसाठी, राज्य शासन निदेश देईल अशा एका किंवा अनेक ठळक जागी लावण्यात येईल.

(५) पोटकलम (१) अन्वये प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ही, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

**२६.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीकडून करण्यात आला असेल तेव्हा, तो अपराध जेव्हा घडला त्यावेळी त्या कंपनीचा प्रभार असलेली आणि त्या कंपनीचे कामकाज चालवण्याबाबत जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल, आणि तद्नुसार कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा होण्यास पात्र असेल :

परंतु असे की, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कोणत्याही व्यक्तीने, जर तिने तो अपराध तिला माहित नसताना घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी खबरदारी घेतली होती असे सिध्द केले तर, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवली जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीकडून घडला असेल आणि जर असे सिद्ध करण्यात आले असेल की, तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूक संमतीने घडला आहे किंवा त्यांच्या हयगयीमुळे घडला आहे तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाही केली जाईल आणि तद्नुसार त्यास शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगमनिकाय, असा आहे आणि त्यांत भागीदारी संस्था व व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा भागीदारी संस्थेच्या संबंधात अर्थ, त्या भागीदारी संस्थेचा भागीदार, असा आहे.

**अपराध जमानतपात्र असणे.**

**२७.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध जमानतपात्र असेल.

**अपराध आपसात मिटविणे.**

**२८.** (१) कलम ४ किंवा कलम ६ खाली केलेला कोणताही अपराध, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून अशा अपराधाबाबत खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, आणि दोनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या मोबदल्यात आपसात मिटवता येईल.

(२) जेव्हा एखादा अपराध पोटकलम (१) अन्वये आपसात मिटवण्यात आला असेल तेंव्हा, अपराधी जल अभिरक्षेत असेल तर त्याला सोडून देण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध अशा अपराधाबाबत पुढील कार्यवाही केली जाणार नाही.

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

**२९.** या अधिनियमा अन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा केंद्र सरकारचा किंवा कोणत्याही राज्य शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

**अनुसूचीमध्ये कोणत्याही तंबाखू उत्पादनांची भर घालण्याचा अधिकार.**

**३०.** केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची आपल्या तसे करण्याच्या हेतूची नोटीस दिल्यानंतर तत्सम अधिसूचनेद्वारे इतर ज्या कोणत्याही तंबाखू उत्पादनाची जाहिरात त्याच्या मते प्रतिबंधित करणे आवश्यक असेल आणि त्याचे उत्पादन, पुरवठा व वितरण या अधिनियमान्वये विनियमित करणे आवश्यक असेल त्या उत्पादनाची अनुसूचीत भर घालता येईल आणि त्यानंतर ती अनुसूची अशा उत्पादनांना लागू करताना तद्नुसार सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.**

**३१.** (१) केंद्र सरकारला या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वधारणतेला बाधा न आणता अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ च्या खंड (ण) अन्वये सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या बाबतीत ज्या नमुन्यात व रीतीने इशारा द्यावयाचा तो नमुना व रीत विनिर्दिष्ट करणे ;

(ख) कलम ७, पोटकलम (५) च्या परंतुकान्वये सिगारेटमध्ये किंवा इतर तंबाखू उत्पादनांमध्ये अनुज्ञेय असेल असे निकोटिन आणि टारच्या घटकांचे किमान प्रमाण विनिर्दिष्ट करणे ;

(ग) कलम ८, पोटकलम (२) अन्वये सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या प्रत्येक पुडक्यावर किंवा त्यांच्या लेबलवर वैधानिक इशारा नमूद करण्याची रीत विनिर्दिष्ट करणे ;

(घ) कलम १० अन्वये, वैधानिक इशारा देताना किंवा सिगारेटमधील किंवा इतर तंबाखू उत्पादनांमधील निकोटिन आणि टारचे घटक दर्शविताना वापरण्यात येणाऱ्या अक्षरांची आणि आकड्यांची किंवा दोहोंची उंची विनिर्दिष्ट करणे ;

(ङ) कोणत्याही इमारतीत प्रवेश करण्याची आणि तिची झडती घेण्याची रीत आणि सिगारेटची किंवा इतर तंबाखू उत्पादनांची पुडकी ताब्यात घेण्याची रीत आणि ताब्यात घेतलेल्या मालाची यादी तयार करण्याची व ज्या व्यक्तीच्या कब्जातून अशी सिगारेटची किंवा इतर तंबाखू उत्पादनांची पुडकी ताब्यात घेण्यात आली असतील त्या व्यक्तीला ती सुपूर्द करण्याची रीत, यांची तरतूद करणे ;

(च) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम आणि कलम ३० अन्वये केलेली प्रत्येक अधिसूचना, ती करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक लागोपाठची सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात किंवा अधिसूचनेत कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम किंवा ती अधिसूचना करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा ती अधिसूचना अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये किंवा अधिसूचने अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**निर्यात केल्या जाणाऱ्या सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादने यांना हा अधिनियम लागू नसणे.**

**३२.** निर्यात केल्या जाणाऱ्या सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादने यांना किंवा सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांना या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही बाब लागू होणार नाही :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे, वैधानिक इशारा आणि निकोटीन व टारचे घटक नमूद न केलेल्या सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांची कोणत्याही देशात निर्यात करण्यास, त्या त्या वेळी त्या देशात अंमलात असलेल्या कायद्यानुसार, तोच किंवा तशाच स्वरूपाचा वैधानिक इशारा आणि सिगारेट किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांवर निकोटीन आणि टारचे घटक नमूद करणे आवश्यक असेल तर, प्राधिकार प्राप्त होतो असे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या किंवा सिगारेटच्या किंवा इतर तंबाखू उत्पादनांच्या पुडक्यांच्या निर्यातीसाठी जर आवश्यक ती उपाययोजना आधीच करण्यात आली असेल तर, प्रत्यक्ष निर्यात जरी केली नसली तरीही, त्यांची निर्यात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केली असल्याचे मानण्यात येईल.

**३३.** (१) सिगारेट (उत्पादन, पुरवठा आणि वितरण यांचे विनियमन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा ४९) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) असे निरसन झाले असले तरीही, उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, जेथवर ती या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, अशी कोणतीही गोष्ट किंवा केलेली कारवाई करण्यात आली तेव्हा, जणू काही उक्त तरतुदी अंमलात होत्या असे मानून, या अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा कारवाईमुळे ती निष्प्रभावित होईपर्यंत ती अंमलात असण्याचे चालू राहील.

# THE CIGARETTES AND OTHER TOBACCO PRODUCTS (PROHIBITION OF ADVERTISEMENT AND REGULATION OF TRADE AND COMMERCE PRODUCTION, SUPPLY AND DISTRIBUTION) ACT, 2003.

## सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| auditorium | श्रोतृगृह | [Sec. 3 (l)] |
| brand name | ब्रँड नाव | [Sec. 5 (3) (b)] |
| carton | खोका | [Sec. 3 (i)] |
| chewing material | चघळण्याचे पदार्थ | [schedule] |
| chewing tobacco | चघळण्याचा तंबाखू | [schedule] |
| cigarette tobacco | सिगारेटचा तंबाखू | [schedule] |
| concerted action | एकत्रित प्रयत्न | [Preface] |
| conviction | दोष सिद्ध होणे | [Sec. 20 (1)] |
| cross bones | फुलीच्या आकारातील हाडे | [Sec.7(a)] |
| custody | कब्जा | [Sec. 31 (m)] |
| detract | कमी लेखणे | [Sec. 9 (2)] |
| dialect | बोलीभाषा | [Sec.3 (g)] |
| enjoined | व्यादिष्ट | [4th Para.] |
| fine | द्रव्यदंड | [Sec. 20 (1)] |
| graphic matter | रेखाचित्रीय मजकूर | [Sec. 3 (a)] |
| graphic material | रेखाचित्रीय मजकूर | [Sec. 8 (c)] |
| hookah tobacco | हुक्याचा तंबाखू | [schedule] |
| in distinct contrast | स्पष्टपणे वेगळा उठून दिसणारा | [Sec. 8 (c)] |
| in session | सत्रासीन | [Sec. 31 (3)] |
| ingredient | घटकद्रव्य | [schedule] |
| Involuntary Exposure | अनैच्छिकपणे बळी पडणे | [Preface] |
| largest panel | सर्वात मोठा पृष्ठभाग | [Sec. 7 (4)] |
| leaflet | पर्णक | [Sec. 5 (2) (c)] |
| panel of the package | पुडक्याचा पृष्ठभाग | [Sec. 7 (4)] |
| pipe tobacco | पाईपचा तंबाखू | [schedule] |
| plenary meeting | सर्वसमावेशक बैठक | [Preamble] |
| power to seize | जप्तीचा अधिकार | [Sec. 13 m.n.] |
| progressive restrictions | वाढते निर्बंध | [Preamble] |
| risk groups | अधिक धोका संभवणारे गट | [Preamble] |
| saving | व्यावृत्ती | [Sec. 33] |

| | | |
|---|---|---|
| search | झडती | [Sec. 12] |
| seizure | सक्तीने ताब्यात घेणे | [Sec. 12 (2)] |
| snuff | तपकीर | [schedule] |
| skull | कवटी | [Sec. 7 (1)] |
| smoking of tobacco | तंबाखूचे धूम्रपान | [Sec. 3 (r)] |
| smoking area | धूम्रपान क्षेत्र | [Sec. 4 (proviso)] |
| tobacco products | तंबाखू उत्पादने | [Sec. 3 (p)] |
| tooth powder containing tobacco | तंबाखूयुक्त दंतमंजन | [schedule] |
| transmit | पारेषित करणे | [Sec. 3 (a)] |
| valuable consideration | मूल्याचा मोबदला | [Sec. 7 (3)] |
| video tape | दृकश्राव्य फीत | [Sec. 5 (2) (b)] |
| visible representation | दृश्य प्रतिरूपण | [Sec. 3 (a)] |
| wrapper | आवेष्टन | [Sec. 3 (a)] |

**सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३**

# THE CIGARETTES AND OTHER TOBACCO PRODUCTS (PROHIBITION OF ADVERTISEMENT AND REGULATION OF TRADE AND COMMERCE PRODUCTION, SUPPLY AND DISTRIBUTION) ACT, 2003.

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिक धोका संभवणारे गट | risk groups | [उद्देशिका] |
| अनैच्छिकपणे बळी पडणे | involuntary exposure | [उद्देशिका] |
| आवेष्टन | wrapper | [कलम ३ (अ)] |
| एकत्रित प्रयत्न | concerted action | [उद्देशिका] |
| कब्जा | custody | [कलम ३१ (ङ:)] |
| कमी लेखणे | detract | [कलम ९ (२)] |
| कवटी | skull | [कलम ७ (१)] |
| खोका | carton | [कलम ३ (झ)] |
| घटकद्रव्य | ingredient | [अनुसूची] |
| चघळण्याचा तंबाखू | chewing tobacco | [अनुसूची] |
| चघळण्याचे पदार्थ | chewing material | [अनुसूची] |
| जप्ती | seizure | [कलम १२ (२)] |
| झडती | search | [कलम १२] |
| तपकीर | snuff | [अनुसूची] |
| तंबाखू उत्पादने | tobacco products | [कलम ३ (त)] |
| तंबाखूचे धूम्रपान | smoking of tobacco | [कलम ३ (द)] |
| तंबाखूयुक्त दंतमंजन | tooth powder containing tobacco | [अनुसूची] |
| जप्तीचा अधिकार | power to seize | [कलम १३] |
| दोष सिद्ध होणे | conviction | [कलम २० (१)] |
| द्रव्यदंड | fine | [कलम २० (२)] |
| दृकश्राव्य फीत | video tape | [कलम ५ (२) (ख)] |
| दृश्य प्रतिरूपण | visible representation | [कलम ३ (क)] |
| धूम्रपान क्षेत्र | smoking area | [कलम ४ (परंतुक)] |
| पर्णक | leaflet | [कलम ५ (२) (ग)] |
| पाईपचा तंबाखू | pipe tobacco | [अनुसूची] |
| पारेषित करणे | transmit | [कलम ३ (क)] |
| पुडक्याचा पृष्ठभाग | panel of the package | [कलम ७ (४)] |
| बोलीभाषा | dialect | [कलम ३ (छ)] |
| ब्रँड नाव | brand name | [कलम ५ (३) (ख)] |
| फुलीच्या आकारातील हाडे | cross bones | [कलम ७ (अ)] |
| मूल्याचा मोबदला | valuable consideration | [कलम ७ (३)] |
| रेखाचित्रीय मजकूर | graphic matter | [कलम ३ (क)] |
| रेखाचित्रीय मजकूर | graphic material | [कलम ८ (अ)] |
| वाढते निर्बंध | progressive restrictions | [उद्देशिका] |

| | | |
|---|---|---|
| व्यादिष्ट | enjoined | [४ था परिच्छेद] |
| व्यावृत्ती | saving | [कलम ३३] |
| सत्रासीन | in session | [कलम ३१ (३)] |
| सर्वसमावेक्षक बैठक | plenary meeting | [उद्देशिका] |
| सर्वात मोठा पृष्ठभाग | largest panel | [कलम ७ (४)] |
| स्पष्टपणे वेगळा उठून दिसणारा | in distinct contrast | [कलम ८ (ग)] |
| सिगारेटचा तंबाखू | cigarette tobacco | [अनुसूची] |
| श्रोतगृह | auditorium | [कलम ३ (ठ)] |
| हुक्क्याचा तंबाखू | hookah tobacco | [अनुसूची] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई